जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी 10 MAY 2016



कोल्हापूर : कर्मवीर भाऊराव पाटील यांना स्मृतिदिनानिमित्त आज शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. एस. एस. महाजन आदी.

# विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील यांना स्मृतिदिनी अभिवादन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** कर्मवीर भाऊराव पाटील यांना स्मृतिदिनानिमित्त आज शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. विद्यापीठ प्रांगणातील कर्मवीरांच्या पूर्णाकृती पुतळ्यास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. एस. एस. महाजन यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

10 MAY 2016

# ७४१ जणांनी दिली प्रवेश परीक्षा

## शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर अभ्यासक्रम



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आज, सोमवारपासून प्रवेश परीक्षेला सुरुवात झाली. सोमवारी ऑफलाईन पद्धतीने ७४१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यामध्ये बीजेसी, एमजेसी, एम. ए. शाखा बदल, एमबीए दूरस्थ, एम. ए. मास कम्युनिकेशन या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा सुरु झाली. सोमवारी पाच अभ्यासक्रमांसाठी झालेल्या प्रवेश परीक्षेसाठी एकूण ९४९ विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ७४१ विद्यार्थी परीक्षेला बसले, तर २०९ जण गैरहजर होते.

कोल्हापूर, सांगली, सातारा आणि सांगली या ठिकाणी ही परीक्षा झाली. यामध्ये बीजेसीसाठी १२२, एमजेसीसाठी १८, एम. ए. शाखा बदल ३०७, एमबीए दूरस्थ २७३, तर एम. ए. मास कम्युनिकेशन २१ जणांनी परीक्षा दिली. तर यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट कोस 'अंतर्गत एमएसडब्ल्यू, एमआरएस, एमसीए, एम. टेक. या अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा आज, मंगळवारी ऑफलाईन पद्धतीने होणार आहे.

इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, एमसीए (सायन्स् कॉमर्स), एम.एस्सी. मॅथेमॅटिक्स, बॉटनी, अॅप्लाईड स्टॅटस्टिक्स् अँड इन्फॉर्मेटिक्स्, फिजिक्स, जिऑलॉजी, मायक्रोबायोलॉजीची प्रवेश परीक्षा ऑफलाईन पद्धतीने उद्या, बुधवारी होणार आहेत.

बी. लिब. अॅण्ड इन्फॉर्मेशन सायन्स्, एम.ए., एम.एस्सी., अॅग्रो केमिकल्स् अॅण्ड पेस्ट मॅनेजमेंट, जिओग्राफी, एम.एस्सी. केमिस्ट्रीच्या दि. १२ मे रोजी, तर बायो केमिस्ट्री, इन्व्हायरमेंटल बायोटेक्नॉलॉजी, एम.एस्सी. झुलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, फूड सायन्स् अँड टेक्नॉलॉजी, इन्व्हायरमेंटल सायन्स अभ्यासक्रमाची परीक्षा दि. १३ मे रोजी होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ
10 MAY 2016

# ७४१ विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठातर्फे झालेल्या विविध अभ्यासक्रमांकरिता ७४१ विद्यार्थ्यांनी आज प्रवेश परीक्षा दिली. बीजेसी, एमजेसी, एम. ए. फॅकल्टी चेंज, एम. बी. ए. डिस्टन्स मोड व एम. ए. मास कम्युनिकेशन अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा झाली.

प्रवेश परीक्षेसाठी एकूण ९४९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७४१ विद्यार्थी परीक्षेस बसले. सकाळी नऊ वाजता परीक्षेस सुरवात होणार असल्याने आठ वाजता विद्यार्थी परीक्षा केंद्रावर हजर होते. मानव्यशास्त्र इमारतीत बैठक व्यवस्था करण्यात आली होती. उद्या (ता. १०) एम. एस. डब्ल्यू. (रुरल कम्युनिटी डेव्हलपमेंट), एम. आर. एस. (मास्टर ऑफ रुरल स्टडीज), एम. सी. ए. (रुरल इन्फॉर्मेटिक्स), एम. बी. ए. (रुरल मॅनेजमेंट), एम. टेक. (रुरल टेक्नॉलॉजी) अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा होणार आहे.

| अभ्यासक्रम | उपस्थित विद्यार्थी |
|---|---|
| बीजेसी | ११६ |
| एमजेसी | १८ |
| एम. ए. फॅकल्टी चेंज | ३०७ |
| एम. बी. ए. डिस्टन्स मोड | २३९ |
| एम. ए. मास कम्युनिकेशन | १८ |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी
10 MAY 2016

# बी.जे.सी., एम.बी.ए, एम. ए. प्रवेश परीक्षेला ७४१ विद्यार्थी

## परीक्षांना प्रारंभ; २०८ विद्यार्थी गैरहजर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पदव्युतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षांना (एंट्रान्स एक्झाम)ला शांततेत सुरुवात झाली. बी.जे.सी., एम.जे.सी., एम.ए. (फॅकल्टी चेंज), एम.बी.ए. (डिस्टन्स मोड), एम.ए. (मास कम्युनिकेशन)च्या ऑफलाईन प्रवेश परीक्षेला ७४१ विद्यार्थी बसले. २०८ विद्यार्थी गैरहजर राहिले.

विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केल्यानुसार विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांना सोमवार (दि.९) पासून प्रारंभ झाला. सकाळी ९ ते ६ यावेळेत ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात आली. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा, संत गाडगे महाराज महाविद्यालय, कराड, कस्तुरबा वालचंद महाविद्यालय, सांगली ही परीक्षा केंद्र होती. सकाळपासूनच विद्यार्थ्यांची सर्वच परीक्षा केंद्रांवर गर्दी दिसून आली. परीक्षेसाठी ९४९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. बी.जे.सी.(१२२), एम.जे.सी. (१८), एम.ए.-फॅकल्टी चेंज (३०७), एम.बी.ए.-डिस्टन्स मोड (२७३), एम.ए.-मास कम्युनिकेशन (२१) विद्यार्थी परीक्षेला सामोरे गेले. १० मे रोजी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट कोर्सअंतर्गत एम.एस. डब्ल्यू (रूरल कम्युनिटी डेव्हलपमेंट), एम.आर.एस. (मास्टर ऑफ रूरल स्टडीज), एम.सी.ए. (रूरल इन्फॉर्मेटिक्स), एम.बी.ए. (रूरल मॅनेजमेंट), एम.टेक(रूरल टेक्नॉलॉजी) अभ्यासक्रमाच्या ऑफलाईन पद्धतीने परीक्षा होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत
10 MAY 2016

# पर्यावरण सुसंगत प्रकल्पाची गरज : शिंदे

कोल्हापूर : आधुनिक ज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारावर पर्यावरण सुसंगत व प्रदूषणविरहित प्रकल्पांची उभारणी करणे काळाची गरज आहे. विद्यापीठातही जैव-ऊर्जा व कचरा व्यवस्थापनावर आधारित आधुनिक पथदर्शी प्रकल्प राबविण्याचा मानस आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले.

इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी आणि चाणक्य इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक लिडरशीपतर्फे आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, स्थानिक उद्योगांना अद्यावत ज्ञान व तंत्रज्ञानाबाबत अवगत करण्यासह त्यांच्याशी संवाद वाढविण्यासाठी विद्यापीठ सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. 'सीआयपीएल'चे संचालक रणजित शेट्टी म्हणाले, 'सीआयपीएल'च्या माध्यमातून सुप्रशासनाशी संबंधित मार्गदर्शन करण्याबरोबरच कचऱ्यातून संपत्तीची निर्मिती करण्याचे ध्येय बाळगून अनेक प्रकारचे संशोधन करण्यात येत आहे.

या चर्चासत्रात पुण्याच्या प्रायमोव्ह इंजिनिअरिंगच्या राजेश दाते (अॅग्रो रेसिड्यू टू बायो-सीएनजी) गंगोत्री इको टेक्नॉलॉजीजच्या संतोष गोंधळेकर (वेट वेस्ट टू सीएनजी लिक्विड फर्टिलायझर अँड ब्रिक्वेट्स) मार्गदर्शन केले. यावेळी उद्योगपती सचिन मेनन, एस. पी. सुतार, अजय मस्के, एन. एम. शिंदे, अनिल काळे, मेधा कुलकर्णी, कुलदीप पाटील, कुशल गोस्वामी, पल्लवी कोरगांवकर, एस. बी. पवार,आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 MAY 2016
सकाळ

# उद्योजकांनी नावीन्याचा शोध घ्यावा : अशोक मोरे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ९ : "गुणवत्ता, कौशल्य, आत्मविश्‍वास, बाजाराचा शोध आणि उपलब्ध संधी या पंचसूत्रीच्या जोरावर यशस्वी उद्योजक होणे शक्य आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे उपसरव्यवस्थापक अशोक मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, युवक कल्याण कक्ष, विद्यापीठ कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्रातर्फे उद्योजकता विकास कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. मानव्यशास्त्र इमारतीतील सभागृहात कार्यक्रम झाला.

श्री. मोरे म्हणाले, "बॅंकांच्या माध्यमातून निधी, पतपुरवठा करण्यात तांत्रिक अडचणी उद्‌भवतात. अशा इच्छुक, गरजू व्यक्तींना आर्थिक मदत करण्याचे काम महामंडळ करते. महामंडळाचा मुख्य उद्देश तळागाळातील सर्व लोकांना समान हक्क प्रदान करण्याचे आहे. बाजारामध्ये कोणत्या वस्तूची मागणी अधिक आहे, पण उपलब्धता कमी आहे, याचा शोध नवउद्योजकांनी घेणे आवश्यक आहे,"

करिअर मार्गदर्शक एम. आय. गरोदिया म्हणाले, "परिश्रमपूर्वक केलेल्या प्रयत्नांमधूनच यशाचा जन्म होतो. प्रत्येकाच्या वेदनांचा विचार करणाराच जीवनात यशस्वी उद्योजक होतो. भारतात इंग्रज दाखल होण्यापूर्वी भारतीय बाजार पेठेतील वस्तूंची जगभर निर्यात होत असे. त्या वेळी भारतातील ६० टक्के लोक उद्योजक होते. हे प्रमाण त्या वेळी शेजारील चीनपेक्षा अधिक होते."

डॉ. शिंदे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणाच्या जोडीनेच आता उद्योजकीय धडे गिरवण्याची गरज आहे." बॅंक ऑफ इंडियाच्या कोल्हापूर शाखेचे व्यवस्थापक एम. जी. कुलकर्णी, उद्योजक संग्राम पाटील, डीआयसीचे सरव्यवस्थापक एस. डी. शेळके, एमसीईडीचे प्रकल्प संचालक वनिता पाटील यांनीही मार्गदर्शन केले. कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठ कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती मार्गदर्शन केंद्राचे संचालक सचिन जाधव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत
10 MAY 2016

## अशोक मोरे : विद्यापीठात उद्योजकता विकास कार्यशाळा

# उपलब्ध संधीतून उद्योजक होणे शक्य

कोल्हापूर : गुणवत्ता, कौशल्य, आत्मविश्वास, बाजाराचा शोध आणि उपलब्ध संधी या पंचसूत्रीच्या जोरावर यशस्वी उद्योजक होणे शक्य आहे, असे प्रतिपादन राज्य शासनाच्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे उपसरव्यवस्थापक अशोक मोरे यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, युवक कल्याण कक्ष आणि विद्यापीठ कौशल्य विकास व रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्रातर्फे आयोजित उद्योजकता विकास कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तर करिअर मार्गदर्शक एम. आय. गरोदिया प्रमुख उपस्थित होते.

मोरे म्हणाले, बँकांच्या माध्यमातून पतपुरवठा करण्यात तांत्रिक अडचणी उद्भवतात. अशा इच्छुक, गरजू व्यक्तींना आर्थिक मदत करण्याचे काम महामंडळ करते. बाजारामध्ये कोणत्या वस्तूची मागणी अधिक पण उपलब्धता कमी आहे, याचा शोध नवउद्योजकांनी घेणे आवश्यक आहे.

गरोदिया म्हणाले, अत्यंत परिश्रमपूर्वक केलेल्या प्रयत्नांमधूनच यशाचा जन्म होतो. प्रत्येकाच्या वेदनांचा विचार करणाराच जीवनात यशस्वी उद्योजक होतो. छोट्या-छोट्या प्रयोगांतून प्रथम प्रयत्न करावेत. त्यानंतर मोठी झेप घ्यावी. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासह उद्योजकीय धडे गिरविण्याची गरज आहे. प्रत्येकामध्ये क्षमता असते. त्या क्षमतेचा उपयोग कुटुंबाचा आणि समाजाचा विकास करण्यासाठी करावा.

कार्यक्रमात कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठ कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राचे संचालक सचिन जाधव यांनी आभार मानले. दरम्यान, कार्यशाळेत बँक ऑफ इंडियाच्या कोल्हापूर शाखेचे व्यवस्थापक एम. जी. कुलकर्णी, उद्योजक संग्राम पाटील, एस. डी. शेळके, एम.सी.ई.डी.च्या प्रकल्प संचालक वनिता पाटील यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.